**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली**

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

जा.क्र.उविमम्/ठेका/431/२०२२ दि. 14 MAR 2022

नोटीस

या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील प्रक्षेत्रावरील ट्रॅक्टर चालविणेसाठी वाहन चालक म्हणुन कामे करणेकरीता दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ या कालावधीत खालीलप्रमाणे कामे करणे आवश्यक आहे. सदर कामे ठेका पद्धतीने करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी निम्नस्वाक्षरीदारांकडुन कामाचे स्वरूप समजावुन घेवुन आपले दरपत्रक बंद लखोटयातुन दिनांक 23.3.2022 पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात पोहचतील असे पाठवावे. लखोटयावर ट्रॅक्टर चालविणेसाठी वाहन चालक म्हणुन ठेका पद्धतीने कामे करण्याचे दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे.

| **कामाचा कालावधी** | **ट्रॅक्टर चालविणेसाठी वाहन चालकाची विविध कामांचा तपशिल** | **मजुरीचा दर** |
|---|---|---|
| एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ (१२ महीने) | १. प्रक्षेत्रावर नांगरणी करणे, कोळपणी करणे .<br>२. रोपवाटीकेतील कलमांची/रोपांची वाहतूक करणे.<br>३. प्रक्षेत्रावरील कचरा, खते, माती, शेणखत इ. ची वाहतूक करणे.<br>४. ट्रॅक्टरला स्लॅशरची जोडणी करून अनावश्यक वाढलेले गवत कापणे.<br>५. ट्रॅक्टरला शेडरची जोडणी करून नारळ व तेलताड झाडांची झावळे यांचे तुकडे करणे.<br>६. आयत्यावेळी प्रक्षेत्रावरील सांगितलेली तातडीची कामे करणे. | दर रू. प्रति दिवस नमुद करावा. |

**कामाच्या अटी व शर्तीखालीलप्रमाणे आहेत.**

१. उमेदवाराकडे वाहन चालविण्याचा उपप्रादेशिक वाहतूक अधिकारी (RTO) यांचेकडुन प्राप्त अधिकृत परवाना आवश्यक आहे.
२. नेमणूक झालेल्या उमेदवाराला ज्या दिवशी वाहन चालविण्याचे काम नसेल त्या दिवशी त्याला कार्यालयाने सांगितलेली इतर कामे करावी लागतील.
३. नेमणूक झालेल्या उमेदवाराने वाहनाचे काम संपल्यावर ते स्वच्छ करण्याचे तसेच किरकोळ देखभालीचे काम करणे आवश्यक आहे. (उदा. वाहनाला लागणारा चिखल धुणे, वाहन पुसणे इ.)
४. वाहनामध्ये काही तांत्रिक दोष आढळल्यास त्याची कल्पना लगेचच कार्यालयाचे अधिकारी यांना लेखी स्वरूपात दयावयाची आहे.
५. योग्य उमेदवाराची नेमणूक वाहन चालक म्हणून या कार्यालयाकडे असणारी वाहने उदा. ट्रॅक्टर इ. चालविण्याकरीता करण्यात येईल. सदर नेमणूक ही तात्पुरत्या स्वरूपाची (ठेका पद्धतीची ) असून उमेदवारास कायमस्वरूपी नेमणुकीबाबत कोणताही दावा करता येणार नाही अथवा हक्क सांगता येणार नाही.
६. कामाची वेळ सकाळी ७.४५ ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० अशी राहील.
७. नेमुण दिलेली कामे क्षेत्रिय कर्मचाऱ्यांच्या सुचनेनुसार कार्यालयीन वेळेत पूर्ण करावयाची आहे.
८. ठेकेदाराच्या अधिपत्याखाली कामगारांना काही दुखापत झाल्यास किंवा त्यांचा अपघात झाल्यास तसेच अपघात विमा काढण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९. ठेक्याच्या कामासंबंधी अधिक माहीतीसाठी निम्नस्वाक्षरीकारांनी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.
१०. अर्जाचा नमुना उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदेच्या कार्यालयात सार्वजनिक सुट्टयाखेरीज कार्यालयीन वेळेत देण्यात येईल.
११. सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

आपला विश्वासु,

सहयोगी अधिष्ठाता,
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

प्रत माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी:

१. कार्यालयीन नोटीसबोर्ड
२. ग्रामपंचायत कार्यालय, मुळदे ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग
३. ग्रामपंचायत कार्यालय, आंबडपाल ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग
४. ग्रामपंचायत कार्यालय, पावशी ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग